# राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमाना विस्तार विषयक सुधारणा करिता सहाय्य (आत्मा) अंतर्गत रिक्त पदे सेवा निवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांमधून भरण्याकरिता नामिकासूची तयार करण्यासाठी वैयक्तिक माहितीसह अर्ज मागविण्यात येत आहेत.

राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमाना विस्तार विषयक सुधारणा करिता सहाय्य (आत्मा) अंतर्गत कृषि संचालक (आत्मा) कार्यालय व अधिनस्त कार्यालयात मंजूर करण्यात आलेली करार तत्त्वावरिल पदे आवश्यकतेनुसार भरणेसाठी नामिकासूची तयार करणेसाठी सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार त्या पदाकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या पात्र सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार थेट मुलाखतीव्दारे सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांची निवड करून नामिकासूची तयार करण्यात येईल आणि या नामिकासूचीतील अधिकारी कर्मचाऱ्यांना आवश्यकतेनुसार रिक्त पदावर नियुक्ती देण्यात येईल.

प्रकल्पातील विविध स्तरावरील पदे, संख्या, शैक्षणिक अर्हता, अनुभव, कामाचे स्वरूप, अर्जाचा विहित नमुना व अर्ज करण्याची पध्दती इ. बाबतची सविस्तर माहिती https://www.smart-mh.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादीबाबतच्या स्वस्वाक्षरीत प्रमाणपत्रांसह विहित नमुन्यातील आपला अर्ज दि. २९/०७ /२०२२ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यत किंवा त्यापूर्वी खालील पत्त्यावर सादर करावेत. उमेदवारांनी **Hard Copy** मध्ये सादर केलेले अर्जच विचारात घेतले जातील. ई-मेल किंवा तत्सम व्दारे सादर केलेले **Soft Copy** मधील अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

## अर्ज सादर करण्याचा पत्ता

कृषि संचालक (आत्मा) कृषि आयुक्तालय, साखर संकुल,दुसरा मजला, शिवाजी नगर, पुणे-५.

# सेवा निवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांकरिता सर्व साधारण सूचना

१. राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमाना विस्तार विषयक सुधारणा करिता सहाय्य (आत्मा) योजणे अंतर्गत कृषि संचालक (आत्मा) कार्यालय व अधिनस्त कार्यालयात मंजूर करण्यात आलेली करार तत्त्वावरिल पदे आवश्यकतेनुसार भरणेसाठी नामसूचिका (Panel) तयार करण्यात येत आहे.

२. सदर पदे भरण्याकरिता त्या संवर्गातील पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या व विहीत गुणवत्ता धारण करणाऱ्या शासकीय अधिकारी /कर्मचारी यांचेकडून खालील सर्वसाधारण अटी व शर्तींचे अधीन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

   i. पात्र अधिकारी / कर्मचारी यांचे नाम सुचिका (Panel) तयार करण्यात येईल व नाम सुचिकेची वैधता ३ वर्षाकरिता असेल. नाम सुचिकेतील अधिकारी / कर्मचाऱ्यांमधून आवश्यकतेनुसार योजणेत नियुक्ती केली जाईल.

   ii. योजनेतील पदांवर अर्ज करणाऱ्या सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी प्रस्तावित / सुरु नसावी.

   iii. योजनेतील नियुक्ती प्रथम एक वर्षाकरिता व तदनंतर आवश्यकतेनुसार कमाल २ वर्षाकरिता अशी कमाल ३ वर्षाकरिता नियुक्ती असेल. असे असले तरी प्रस्तुत नियुक्त्या हया योजनेसाठी मंजुर पदांवर केल्या जात असल्याने शासनाकडून नियमित अधिकाऱ्यांची नियुक्ती झाल्यास त्यांच्या सेवा आपोआप संपुष्टात येतील.

   iv. योजणेमार्फत दिले जाणारे परिश्रमिक व भत्ते हे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१६/१२/२०१७ मधील तरतुदीनुसार असेल.

   v. वयोमर्यादा-सेवा निवृत्त कर्मचारी नियुक्तीनंतर वयाच्या ६५ वर्षापर्यंत कार्यरत राहू शकतील. आवश्यकतेनुसार सदरची वयोमर्यादा ७०वर्षापर्यंत सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेने वाढविण्यात येईल.

   vi. नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांना योजणेत नियमित करण्याची कोणतेही अधिकार / हक्क नसेल.

   vii. नियुक्ती अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा गैरर्वतन, कामकाजात चुकारपणा, आर्थिक व प्रशासकीय अनियमितता, हितसंबंध संघर्ष (Conflict of interest) इ. कारणास्तव समाप्त करण्याचे अधिकार योजणेस राहतील.

   viii. वरील अटी व शर्ती शिवाय सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१६/१२/२०१७ मधील तरतुदी लागू राहतील.

३. जाहिरातीमध्ये नमुद पदांची संख्या, शैक्षणिक अर्हता, अनुभव व कामाचे स्वरूप या बाबतचा तपशील https://www.smart-mh.org संकेतस्थळावर उपलब्ध आहे. योजणेच्या गरजेनुसार त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार योजणेने राखून ठेवले आहेत.

४. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता,अनुभव व इतर अनुषंगिक कागदपत्रे /प्रमाणपत्रे स्वस्वाक्षरीत करून सादर करणे अनिवार्य आहे. तसे नसल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही. तसेच अर्जावरील फोटोवर स्वाक्षरी करावी.

५. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी अर्जासोबत महालेखाकार यांचे सेवानिवृत्ती वेतन आदेश सादर करावेत.

६. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी विहित नमुन्यातील अर्ज https://www.smart-mh.org या संकेतस्थळावरून download करून परीपूर्ण अर्ज खालील पत्त्यावर दि.२९/०७/२०२२ रोजी सायकाळी ५.३० वाजेपर्यंत सादर करावेत. विहित वेळेनंतर प्राप्त होणारे अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत.

राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमाना विस्तार विषयक सुधारणा करिता सहाय्य (आत्मा)
कृषि संचालक (आत्मा)
कृषि आयुक्तालय, साखर संकुल,दुसरा मजला,
शिवाजी नगर, पुणे-५.

७. प्राप्त अर्जांची छाननी केल्यानंतर पात्र सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांना प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार मुलाखतीकरिता बोलविण्यात येईल.

८. जाहिरातीमध्ये नमूद पदांकरिताची निवड प्रक्रिया, अटी शर्ती इ. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार राहील.

९. मुलाखतीसाठी येणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रवास खर्च अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा खर्च प्रकल्प अंमलबजावणी कक्षाद्वारे अदा करण्यात येणार नाही.

# ATMA/AIF मधील कृषि विभागातून भरण्यात येणाऱ्या  पदांचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | पद | संख्या | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | **राज्य समन्वक** | १ | कृषि संचालक, (आत्मा) साखर संकुल शिवाजीनगर  पुणे-५ |
| २ | कृषि अधिकारी | १ | कृषि पायाभुत सुविधा निधी योजना,कृषि भवन पुणे  -५ |
| ३ | बँक अधिकारी | १ | कृषि पायाभुत सुविधा निधी योजना,कृषि भवन पुणे  -५ |
| | **एकुण** | ३ | |